# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२२२ दिनांक-११/०६/२०२४

## “ मे ” महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. २८/०५/२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा.चे पुर्वी धोदाडा डोंगराच्या खाली असलेल्या ओव्हळात हरवटेपाडा, धानिवबाग नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथे एक अनोळखी महिला वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे, अंगात नेसुस गुलाबी रंगाची पंजाबी सलवार सुट व त्यावर चॉकलेटी (वांगी) रंगाचा नकाब असे परिधान केलेल्या महिलेच्या मानेवर, छातीवर कोणत्या तरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरुन लोखंडी चाकुने अगर कोणत्या तरी अन्य धारदार शस्त्राने वार करुन तिचा खुन करुन पुरावा नष्ठ करण्याच्या उद्देशाने सदर अनोळखी महिलेचे प्रेत धोदाडा डोंगराच्या खाली असलेल्या डोंगराचे ओव्हळात, ता. वसई जि.पालघर येथे आणून टाकले बाबत श्री. दिलीप रामचंद्र हरवटे, वय ४९ वर्षे, धंदा- शेती, रा. जिल्हा परिषद शाळेजवळ, हरवटेपाडा, धानिवबाग, ता. वसई, जि. पालघर यांचे तक्रारी वरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ५०४/२०२४ कलम ३०२, २०१ भा. दं. वि. सं. प्रमाणे दिनांक २८/०५/२०२४ रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी स्वतः हाती घेऊन सदर गुन्हयाच्या तपासाची सुरुवात केली.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेऊन श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, व वरिष्ठांनी सदर गुन्हयाचे घटनास्थळी भेट देऊन मयत महिलेची ओळख पटवुन सखोल तपास करुन मयत महिलेच्या वारसाचा शोध घेऊन तिची ओळख पटवुन अज्ञात आरोपीताचा शोध घेणेबाबत पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांचेसह गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. सोपान पाटील, व गुन्हे प्रकटीकरण पथकास योग्य त्या सुचना देऊन मार्गदर्शन केले.

मा.वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे श्री. जितेंद्र वनकोटी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेसह गुन्हे प्रकटीकरण पथकाचे श्री. सोपान पाटील, सहा. पोलीस निरीक्षक, व गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळी घटनास्थळावर मयत महिलेच्या मृतदेहाजवळ वापरलेले एक कंडोम व Universal STUD 5000 for man in you हा स्प्रे ( सेक्ससाठी वापरत असल्याने ) मिळुन आल्याने ते अज्ञात आरोपीने सदर परीसरातीलच मेडीकल शॉपमधुन विकत घेतला असल्याची शक्यता असल्याने गुन्हे प्रकटीकरणचे अधिकारी व कर्मचारी यांनी धानीवबाग परीसरातील प्रत्येक मेडीकलमध्ये जाऊन बॅच नं. E896, 02/2024 बाबत तपास सुरु केला. तेव्हा धानिवबाग परिसरातील एका मेडीकल शॉपमधुन अज्ञात आरोपीत याने सदर कंडोम व Universal STUD 5000 for man in you हा स्प्रे खरेदी करत असल्याचे समजले. सदर शॉपमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता असता दि. २४.०५.२०२४ रोजी सकाळी ०८.४५ वाजता एक अनोळखी इसम एक कंडोम व नमुद प्रॉडक्ट विकत घेवुन जात असताना दिसुन आला.

तसेच सदर प्रकरणाती मयत महिलेच्या मृतदेहाची ओळख पटविण्या करीता नालासोपारा पूर्व परीसरातील मतदार यादया प्राप्त केल्या. मयत महिलेच्या पेहरावावरुन ती मुस्लीम असल्याचे वाटत असल्याने सदर मतदार यादीतील मुस्लीम महिलांचे नावांची शॉर्टलिस्ट तयार करून प्रत्येक घर शोधण्यास सुरुवात केली. त्याप्रमाणे धानीवबाग तलाव येथे राहणाऱ्या जियाउल्लाह म्हातावु शाह याचे घरी दोन लहान मुले दिसुन आली. व त्यांचे सोबत कोणीही नव्हते त्यामुळे आजुबाजुस अधिक तपास केला असता जियाउल्लाह म्हातावु शाह हा पोलीस ठाण्यात गेला असून त्याची पत्नी हि सुमारे तीन दिवसापासुन बेपत्ता असल्याचे समजले. त्यामुळे इसम नामे श्री. जियाउल्लाह म्हातावु शाह वय ३२ वर्ष रा. धानिवबाग

तलावाजवळ, यांची भेट घेवुन त्यांना मयत महिलेचे फोटो दाखवले असता त्यांनी सदरची मयत महिला हि त्यांची पत्नी सौ. सायरा बानु जियाउल्लाह शाह वय- ३४ वर्ष असे असल्याचे सांगितले.

लागलीच त्यास मेडीकल शॉप मध्ये मिळून आलेल्या अनोळखी इसमाचे सीसीटीव्ही फुटेज दाखवले असता त्याने सदर इसम हा त्यांचा भाचा - नजाबुद्दीन मोहम्मद सम्मी, वय- २१ वर्षे, सध्या रा. अमनविहार दिल्ली मुळ रा. ग्राम गौरडिह, पो. धोबहा, तहसिल इटावा, जि.सिद्धार्थनगर, उत्तरप्रदेश मो.नं ९६२५६०७२९३ हा असल्याचे सांगुन त्यांची मयत पत्नी व भाचा नजाबुद्दीन यांचे सुमारे दोन वर्षापासुन अनैतिक संबंध असल्याचे सांगितले. इसम नजाबुद्दीन याचे मोबाईल फोनचे तांत्रिक माहितीच्या आधारे माहिती प्राप्त करुन लागलीच सपोनि/सोपान पाटील व गुन्हे प्रकटीकरण पथकाची टिम दिल्ली येथे रवाना केली. त्यांनी इसम नजाबुद्दीन मोहम्मद सम्मी, यांचा स्थानिक पोलीसांच्या मदतीने दिल्ली येथिल अमनविहार पोलीस ठाणे हद्दीत त्यांचा शोध घेत असतांना आरोपीत हा बेकरीमध्ये काम करत असल्याबाबत माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी रात्रौभरात सुमारे ९० ते १०० बेकऱ्या तपासुन आरोपीत याचा शोध घेवून त्यास ताब्यात घेतले. त्याचेकडे अधिक तपास केला असता त्यानेच मयत महिलेस अनैतिक संबंधावरुन आपसात वाद झाल्याने दिनांक २७/०५/२०२४ रोजी १२.३० वा. च्या सुमारास एका धारदार चाकुने तिचा गळा चिरुन छातीत चाकु खुपसुन जिवेठार मारुन पळून गेला असल्याबाबत सांगितले. सदर आरोपीत यांस दिनांक ३१/०५/२०२४ रोजी अटक करुन गुन्हा उघडकिस आणला आहे.

सदरची कामगिरी करणारे पेल्हार पोलीस ठाणेचे श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शकिल शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, सफौ/सुरेंद्र शिवदे, बाळासाहेब घुटाळ, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, मिथुन मोहिते, संजय मासाळ, किरण आव्हाड, राहुल कर्पे, अभिजीत नेवारे, निखील मंडलिक, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सर्व नेमणुक पेल्हार पोलीस ठाणे, तसेच पोहवा/नामदेव ढोणे, पोअंम./सोहेल शेख नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ ३ यांचा दिनांक ११/०६/२०२४ रोजी मा. मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"मे महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक-१ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



**मा.पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि जितेंद्र वनकोटी**

२)          माणिकपुर पोलीस ठाणेचे हद्दीत दिनांक ०१/०५/२०२४ रोजी पहाटे ०७.२० वा.चे सुमारास गुन्हयातील फिर्यादी श्रीमती रेनिता विजय शिवडवकर, वय ५६ वर्षे, व्यावसाय- गृहिणी, रा. फ्लॅट नं. ०५, बिल्डिंग नं. एन ०२, डायस ॲन्ड परेरा नगर, लॉरेन पार्क, नायगाव प. ता. वसई, जि. पालघर या नायगाव पश्चिम या रेल्वे स्टेशनकडुन विजय परेरा नगरकडे पायी चालत जात असताना नायगाव पोलीस चौकी फळाच्या हात गाडी दुकाना समोर आल्या असता त्यांच्या पाठीमागुन उजव्या बाजुने जाणा-या एका मोटार सायकल स्वाराने अचानकपणे फिर्यादी यांच्या मानेवर हात मारुन फिर्यादी यांच्या गळ्यातील अंदाजे ७५,०००/- रुपये किंमतीची १५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन जबरजस्तीने खेचुन चोरी पळुन गेला असल्याबाबत गुन्हयातील फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.रजि.नं. १४५/२०२४ भादविसं कलम ३९२ प्रमाणे दि. ०१/०५/२०२४ रोजी <u>१२.३७ वा.</u> गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आयुक्तालयातील स्नॅचिंगचे प्रमाण वाढत असल्याने सदर गुन्हयावर आळा घालण्यासाठी वरिष्ठांनी आदेशीत केले होते त्या अनुषंगाने घटनास्थळी भेट देवुन फुटेजची पडताळणी करुन आरोपीताबाबत गुप्त बातमीदाराकरवी माहीती प्राप्त करुन माणीकपुन पोलीस ठाणे गुन्हा रजि नं.१४५/२०२४ भादवि कलम ३९२ प्रमाणे या गुन्हाची उकल करुन आरोपीचे नाव निष्पन्न करुन आरोपी आरीफ याकुब शेख यास ताब्यात घेवुन त्याचेकडे केलेल्या चौकशीतुन जबरी चोरीचे २ व वाहन चोरीचे ३ असे एकुण ५ गुन्हे उघडकीस आणण्यात आले. त्यानंतर त्यास विश्वासात घेवुन वारंवार होत असलेल्या वाहन चोरीचे गुन्हांचे अनुषंगाने त्याचेकडे चौकशीकरुन आरोपीत जमिल खान याचा शोध घेवुन वाहन चोरीचे ६ गुन्हयांची उकल करण्यात आली. असे एकुण ११ गुन्हांची उकल करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखेचे श्री.शाहुराज रणवरे, सपोनिरी/सुहास कांबळे, सपोनिरी/सागर शिंदे, सहाफौज/रमेश भोसले, सहाफौज/संजय नवले, पोहवा/०००१५ रविंद्र पवार, पोहवा/०३०७६ प्रफुल्ल पाटील, पोहवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/०६०२५ सचिन पाटील, पोहवा/०५०३३ जगदिश गोवारी, पोहवा/०६१०७ रमेश आलदर, पोहवा/१२०४७ दादा आडके, पोहवा/१२०५३ सुधीर नरळे, पोना/०३०३२ प्रशांत ठाकुर, पोशि/१२०९७ अमोल कोरे, पो कॉ/राज गायकवाड, पो कॉ/ प्रतीक कोडगे, पो कॉ/अजीत मैड यांचा दिनांक ११/०६/२०२४ रोजीच्या मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ मे महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-२ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार खिकारताना पो.नि श्री. शाहुराज रनवरे**

**३)** ) दि. १५/०५/२०२४ रोजी दु.१४.५० वा वे सुमारास ठाणे घोडबंदर रोडवर, व्दारका हॉटेल समोर चेनागाव येथे आरोपी नामे १)शोएब हनीफ मेमन, वय – ३३ वर्ष, व्यवसाय-जुनी कार खरेदी विक्री, रा. एच. एस. मंजिल खोजा जमात खाना जवळ, कोळीवाडा, वसई (प) ता. वसई जिल्हा पालघर -४०१२०१, मो. नं. ९८२३६०८१०६ २) निकोलस लियोफ्रेड टायटस, वय-३९ वर्ष , व्यवसाय- मोटर मॅकेनिकल रा. सी-२ लॉरेन्स अपार्टमेंट, बाभोळा चुळणा रोड, आदित्य होंडा जवळ वसई (प), ता. वसई , जिल्हा पालघर मो. न. ८६९८३७२८५९ याच्याकडे सुमारे २०,००,०००/- रुपये

(विस लाख रुपये) किंमतीचा १००० ग्रॅम वजनाचा एम. डी.(मॅफेड्रॉन) अंमली पदार्थ मिळुन आला तसेच दोघांचे ताब्यातील वाहन क्र.-४८-डी-११०१ मध्ये एम.डी. पदार्थ विक्री करण्याकरीता उपयुक्त साधन सामुग्री मिळुन आली असल्याने दोन्ही आरोपी हे त्यांच्या ताब्यात मिळुन आलेला एम. डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ विक्री करीता स्वत:कडे बाळगुन ते त्यांच्या ताब्यातील वाहनाचा एम. डी. (मेफेड्रॉन) पदार्थ वाहतुक करण्यासाठी उपयोग करतांना मिळुन आले. म्हणुन सदर बाबत प्रशांत रविंद्र विसपुते वय -४१ वर्ष, पोलीस शिपाई बक्कल नं. ०७११५, नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-१,काशिमीरा, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांनी काशिमीरा ¨मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय. यांनी काशिगांव पोलीस ठाण्यात दिले फिर्यादी वरुन काशिगांव पोस्टे गुरनं. ११०/२०२४, एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(सी), २२(सी), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास गुन्हे कक्ष हे करीत असून गुन्हयात एकुण ३६,७०,१००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखेचे १) पो.निरी. अविराज कुराडे २) सपोनिरी प्रशांत गांगुर्डे ३) सपोनिरी पुष्पराज सुर्वे ४)पोउपनिरी राजु तांबे ५) सपोउपनिरी संदीप शिंदे ६) पो.हवा/९७००९ अविनाश गर्जे ७) पो.हवा/९८००७ सजंय शिंदे ८) पो.हवा/०००२३ संतोष लांडगे ९) पो.हवा/०००२४ पुष्पेंद्र थापा १०) पो.हवा/०६०३४ सचिन हुले ११) पो.हवा/०६०९२ विजय गायकवाड १२)पो.हवा/०६०३७ सचिन सावंत १३) पो.हवा/०८०११ समीर यादव १४) पो.हवा/१००४९ सुधीर खोत १५) पो.हवा/१२०३२ विकास राजपुत १६) पो.हवा/०७११५ प्रशांत विसपुते १७) पो.कॉ./१४०१४ सनी सुर्यवंशी १८) पो.कॉ./२३००३ धिरज मेंगाणे १९)पो.कॉ./२३०१७ गौरव बारी २०) पो.कॉ./२३३२५ सौरभ इंगळे २१)सफौ. संतोष चव्हान सायबर, २२) मसुब किरण आसवले यांचा दिनांक ११/०६/२०२४ रोजीच्या मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ मे महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक-३ म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय** यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पो.नि श्री. अविराज कुराडे**